Date :- 26/04/2019

# चांदवड महाविद्यालयात जागतिक बौध्दिक मालमत्ता दिन साजरा

**चांदवड** - येथील आबड लोढा जैन महाविद्यालयाच्या बौद्धिक संपदा अधिकार कक्ष व प्राध्यापक प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक बौद्धिक संपदा दिनानिमित्त प्रा. नितीन जैन यांचे "बौद्धिक संपदा अधिकार - नाविन्यता आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन " या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. गोटन जैन यांचे हस्ते करण्यात आले. प्रा. नितीन जैन यांनी औद्योगिक बौद्धिक मालमत्ता अधिकार व स्वामित्व हक्क या दोन प्रमुख बौद्धिक संपदा अधिकारांविषयी सखोल माहिती दिली. तसेच या मालमत्तांचे पेटंट,व्यापारचिन्ह,सेवाचिन्ह , परंपरागत ज्ञान, औद्योगिक आराखडा, भौगोलिक सांकेतांक, इंटिग्रेटेड सर्किट, व वनस्पतींच्या विविध प्रजाती हे उपप्रकार व या मालमत्ता धारकांचे विविध अधिकार स्पष्ट केले. केंद्र सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या उद्योग संवर्धन व आंतरिक व्यापार विभागाद्वारे भारतात बौद्धिक संपदा अधिकारांचे नियमन कसे केले जाते हे समजावून सांगितले . अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. गोटन जैन यांनी वर्तमानातील व भविष्यातील बौद्धिक संपदा अधिकारांचे वाढते महत्व पटवून दिले व संशोधन कार्य करीत असताना संशोधकाने बौद्धिक मालमत्ता अधिकारांविषयी सजग राहिले पाहिजे असे प्रतिपादन केले. व्याख्यानाच्या समारोपात डॉ. मनोज पाटील यांनी जागतिक स्तरावर बौद्धिक मालमत्ता अधिकारांचे नियमन 'विपो' या युनाइटेड नेशनच्या संघटनेद्वारे कसे केले जाते हे स्पष्ट केले

या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. गोटन जैन, उपप्राचार्य डॉ. दत्ता शिंपी , डॉ. सुरेश पाटील व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

PRINCIPAL
K.K.H.A. Arts SMGL Comm. & SPHJ
Science (Senior) & S.P.D.S. Arts,
Comm. & Science (Junior) College,
Chandwad, Dist. Nashik - 423 101

दैनिक दिव्य मराठी

# संशोधकाने बौद्धिक मालमत्ता अधिकारांविषयी सजग रहावे



**प्रतिनिधी** | चांदवड

येथील आबड-लोढा- जैन महाविद्यालयाच्या बौद्धिक संपदा अधिकार कक्ष व प्राध्यापक प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक बौद्धिक संपदा दिनानिमित्त प्रा. नितीन जैन यांचे 'बौद्धिक संपदा अधिकार, नावीन्यता आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन' या विषयावर व्याख्यान पार पडले.

उद्‌घाटन प्राचार्य डॉ. गोटन जैन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. नितीन जैन यांनी औद्योगिक बौद्धिक मालमत्ता अधिकार व स्वामित्व हक्क या दोन प्रमुख बौद्धिक संपदा अधिकारांविषयी सखोल माहिती दिली. तसेच या मालमत्तांचे पेटंट, व्यापारचिन्ह, सेवाचिन्ह, परंपरागत ज्ञान, औद्योगिक आराखडा, भौगोलिक सांकेतांक, इंटिग्रेटेड सर्किट व वनस्पतींच्या विविध प्रजाती हे उपप्रकार व या मालमत्ताधारकांचे विविध अधिकार स्पष्ट केले. केंद्र सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारित येणाऱ्या उद्योग संवर्धन व आंतरिक व्यापार विभागाद्वारे भारतात बौद्धिक संपदा अधिकारांचे नियमन कसे केले जाते हे त्यांनी समजावून सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. गोटन जैन यांनी वर्तमानातील व भविष्यातील बौद्धिक संपदा अधिकारांचे वाढते महत्त्व पटवून दिले. संशोधन कार्य करीत असताना संशोधकाने बौद्धिक मालमत्ता अधिकारांविषयी सजग राहिले पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. व्याख्यानाच्या समारोपात डॉ. मनोज पाटील यांनी जागतिक स्तरावर बौद्धिक मालमत्ता अधिकारांचे नियमन 'विपो' या युनायटेड नेशनच्या संघटनेद्वारे कसे केले जाते हे स्पष्ट केले.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. गोटन जैन, उपप्राचार्य डॉ. दत्ता शिंपी, डॉ. सुरेश पाटील आदींसह वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.


Latitude: 20.334428
Longitude: 74.238981
Accuracy: 64.1m
Time: 04-26-2019 15:21
Note: claw
Powered by NoteCam


Meaning
Types of IP
- Patent
- Trademark
- Copyright
Infringement
Case Studies
INTELLECTUAL PROPERTY
Patents
On the occasion of
"World IPR Day - 26th April 2019
"IPR - Encouraging Innovation & Creativity"
Overview